# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०४/०१/२०२४

# प्रेसनोट

मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत दिनांक ०३/०१/२०२४ रोजी क्रांतीवीर सावित्रीबाई ज्योतीबा फुले जयंती ,मिड टाऊन हॉल, गोल मैदान, उल्हासनगर – २ येथे सकाळी १२.०० ते ५.०० या दरम्यान साजरी करण्यात आली. यामध्ये उल्हासनगर शहरातील महिलांनी उत्साहाने व आनंदाने सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे यांनी केले. सदर कार्यक्रमात उप आयुक्त. महिला व बालकल्याण विभाग डॉ. सुभाष जाधव तसेच महापालिका सचिव, सौ. प्रतिभा कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे, उपलेखा अधिकारी(शिक्षण विभाग) सौ. निलम कदम, सिस्टम ऍनालिस्ट(ना.सु.केंद्र) सौ. श्रध्दा सपकाळे व विभाग प्रमुख समग्र शिक्षण विभाग सौ. संगिता लहान, सौ. सलोनी निवकर - जनगणना/आधार विभाग, श्री. राजेश घनघाव - दिव्यांग विभाग, श्री. शांताराम चौधरी - क्रिडा विभाग, श्री. नितेश रंगानी-महिला व बालकल्याण हे उपस्थित होते.

मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजिज शेख साहेबांनी महिलांना चुल व मुल याच्या व्यतिरिक्त स्त्रियांनी शिक्षणाकडे, जास्तीत-जास्त लक्ष दयावे असे प्रेरणादायक व सकारात्मक मार्गदर्शन केले. तसेच क्रांतीवीर सावित्रीबाई ज्योतीबा फुले यांनी त्याकाळात १८ व्या शतकात मुलींची पहिली शाळा सुरु केली व अनोनात मेहनत घेतली याबाबत माहिती दिली. सांस्कृतीक कार्यक्रमाचे सुत्र संचालक सौ. सविता हांडे यांनी केले, सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये सावित्रीबाई फुले, महात्मा फुले व डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांच्या जीवनावर गीत, सांस्कृतीक नृत्य सादर करण्यात आले. तसेच मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे हस्ते कार्यक्रमात उपस्थित महिलांना पारितोषिके व बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.